# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय


रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट १९६-२३ दिनांक २०/०६/२०२३

**बलात्कार व पोक्सो सारख्या गंभीर गुन्हयातील ४ वर्षापासुन पाहिजे असलेल्या आरोपीतास अटक - मिरारोड पोलीस ठाणेची कामगिरी.**

मिरारोड पोलीस ठाणे हद्दीतील फिर्यादी यांची अल्पवयीन मुलीस कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेलेबाबत व शारिरीक संबंध ठेवलेबाबत तक्रार प्राप्त झाल्याने मिरारोड पोलीस ठाणेत दिनांक ०४/०३/२०१९ रोजी गु.रजि.नं. I ६४/२०१९ भा.दं.वि.सं.कलम ३६३, ३७६ (२) (आय) (एन), ३६६, ३४२, ३२३,५०४,५०६,३४ सह बालकांचे लैगिक अपराधापासुन संरक्षण अधि.२०१२ चे कलम ३, ४, ७, ८ सह बालविवाह अधिनियम २००६ चे कलम ९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. नमुद गुन्हयातील पिडीत मुलगी ही मिळुन आलेली होती परंतु गुन्हयातील मुख्य आरोपीत गेले ४ वर्षापासुन मिळुन येत नव्हता. सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन वरिष्ठांन गुन्हयातील अनोळखी आरोपीचा शोध घेणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने मिरारोड पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयसिंह बागल यांनी सदर गुन्हयाचा तपास पोउपनि श्री. किरण वंजारी, गुन्हे प्रकटीकरण कक्ष, मिरारोड पोलीस ठाणे यांचेकडे सुपुर्द केला होता.

सदर गुन्हयाचे तपासादरम्यान मिरारोड पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लषणाव्दारे प्राप्त माहितीच्या अधारे आरोपी नामे रईस शरीफ शेख, रा. ओम शांती चौक, शांतीपार्क, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे मुळ रा. आग्रा, राज्य उत्तर प्रदेश यास दिनांक १६/०६/२०२३ रोजी ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याने वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास अटक करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१, मिरारोड, श्री. महेश तरडे, सहायक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली मिरारोड पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजयसिंह बागल, स.पो.नि. शिवकुमार गायकवाड तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. हनिफ शेख, पो.उप.नि. किरण वंजारी, स.फौ. प्रशांत महाले,

पो.हवा. प्रफुल्ल महाकुलकर, प्रदीप गाडेकर, बालाजी हरणे, पो.अंम. अथर्व देवरे यांनी केलेली आहे.



----ooo----